# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

**2022**

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **मध्यवर्ती कक्ष** **दिनांक ०३/०६/२०२२**

## मोटार ट्रेलर व ट्राली चोरी करणा-या दोन आरोपींना गुन्हे शाखा, मध्यवर्ती कक्ष नवी मुंबई यांनी केली अटक

## एकुण 19,00,000/- रु किमतीचा मुद्देमालासह

- नवी मुंबई आयुक्तालया अंतर्गत जे.एन.पी.टी. पोर्ट असल्याने नवी मुंबई परिरात मोठया प्रमाणावर मोटार ट्रेलर ट्रान्सपोर्ट करीता येत असतात. मागील काही दिवसांपासुन उरण, न्हावाशेवा परिसात मोटार ट्रेलर व ट्राली चोरी जाण्याच्या गुन्हयात वाढ झाल्याने आरोपींचा शोध घेवुन गुन्हयातील गेला माल हस्तगत करणेबाबत मा. पोलीस आयुक्त श्री बिपीन कुमार सिंग, यांनी आदेशित केले होते. त्या अनुषंगाने मा. सह पोलीस आयुक्त डॉ. श्री. जय जाधव , मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. महेश घुर्ये, गुन्हे शाखेचे मा. पोलीस उप आयुक्त श्री. सुरेश मेंगडे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री विनायक वस्त यांनी नवी मुंबई परिसरातील मोटार ट्रेलर करणा-या आरोपींचा शोध घेवुन कारवाई करणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.

मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विजयसिंह भोसले यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनिरी संजय रेड्डी व पोलीस अंमलदार यांचे पथक नेमण्यात आलेले होते. मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई येथील पोउपनिरी./संजय रेड्डी, नेम.मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई. यांना मिळालेल्या गोपनिय माहीतीवरून उरण पोलीस ठाणे, गुन्हा रजि. क्र. I १३३/२०२२ भादविस ३७९ या गुन्हयाचा समांतर तपास मध्यवर्ती कक्षामार्फत चालु असताना सदर गुन्हयातील आरोपी नामे (१) आशिषकुमार शिवकुमार सिंह (२) अजय रामकृपाल चौधरी उर्फ गोविंद यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयाचे तपासात दोन्ही आरोपींचा उरण पो. ठाणे गुन्हा रजि.क्र. १३३/२०२२ भादविस कलम ३७९,४११,३४ या गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाला असुन गुन्हयातील चोरीस गेलेली ट्राली हस्तगत करण्यात आली आहे. तसेच गुन्हयातील तपासादरम्याण अटक आरोपी आशिषकुमार शिवकुमार सिंह याने उरण पो. ठाणे गुन्हा रजि. क्र. १४२/२०२२ हा देखील केल्याची कबुली दिली असुन नमुद गुन्हयातील देखील चोरीस गेलेला मोटार ट्रेलर हस्तगत करण्यात आला आहे. **दोन्ही गुन्हयातील १०० % गेला माल हस्तगत करण्यात आला आहे.**

- **अटक आरोपींचे नाव :-**

१) आशिषकुमार शिवकुमार सिंह, वय २५ वर्षे, धंदा चालक, रा. गौखाडी, पो. देवापुर, जि. प्रतापगड, राज्य - उत्तरप्रदेश

२) अजय रामकृपाल चौधरी उर्फ गोविंद, वय ३८ वर्षे, रा. जगदिश गायकवाड. यांच्या घरासमोर असलेल्या दिलीप श्रीवास्तव यांच्या लाकडाच्या वखारीत, रोडपाली, नवी मुंबई. मुळ रा. उत्तरप्रदेश

- <u>हस्तगत मालमत्ता</u> :-

१) ३,००,०००/- रु किंची मोटार ट्रेलरची ट्राली, जुवाकिंसु. ( **उरण पो. ठाणे गुन्हा रजि. क्र. १३३/२०२२ मधील**)

(२) १६,००,०००/- रु किंचा अशोक लेलड कंपनीचा मोटार ट्रेलर क्र. एम.एच. ४३/यु.- ६८४५ जुवाकिंसु. ( **उरण पो. ठाणे गुन्हा रजि. क्र. १४२/२०२२ मधील**)

----------------------

**१९,००,०००/- रु किंचा एकुण मुद्देमाल**

**सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री बिपीन कुमार सिंग, मा. पोलीस सह आयुक्त डॉ. श्री. जय जाधव , मा. अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री महेश घुर्ये, गुन्हे शाखेचे मा. पोलीस उप आयुक्त श्री सुरेश मेंगडे व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री विनायक वस्त यांचे मार्गदर्शनाखाली -**

**मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे वपोनि विजयसिंह भोसले, पोउपनि/संजय रेड्डी, पोलीस अंमलदार - किरण राउत, प्रकाश साळुंखे, अजय कदम, नंदकुमार ढगे यांनी केलेली आहे.**

**-----ooo-----**

